ePaper

**“मनसेला महायुतीत घ्या”, खासदार राहुल शेवाळेंची मागणी!**



| वर्ष - 7 अंक - 271 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- राहुल राजकोट कसोटीतून बाहेर
- आता हुकुमाचा एक्का काढला
- रायबरेलीवर काँग्रेसचंच वर्चस्व
- चव्हाणांना पटोलेंची खुली ऑफर


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 14 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अशोक चव्हाण राज्यसभेवर?

## » नारायण राणे यांना लोकसभेच्या रिंगणात उतरवणार? चर्चांना उधाण

। रत्नागिरी ।महाईन्यूज

**काँग्रेसचे महाराष्ट्रातील नेते अशोकराव चव्हाण यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने आता त्यांना राज्यसभेची उमेदवारी मिळणार असल्याचे निश्चित मानलं जात आहे. अशोकराव चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशानंतर कोकणात फारशी चांगली स्थिती नसलेल्या काँग्रेसमध्ये कोणताही फार मोठा परिणाम झाला, तरीही आता विद्यमान केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना पुन्हा राज्यसभेवर न पाठवता त्यांना कोकणात रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याची रणनीती भाजपाच्या वरिष्ठ पातळीवर आखण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे आता दस्तूरखुद्द एनटीआर म्हणजेच नारायण राणे यांना उमेदवारी मिळाल्यास महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल आणि याचा मोठा फायदा या निवडणुकीत होईल.**



रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाचे विनायक राऊत हे पुन्हा यंदा उमेदवार असतील त्यांच्यासमोर तुल्यबळ उमेदवार असावा यासाठी भाजपाने थेट नारायण राणे यांच्यासारखे अभ्यासू व आक्रमक नेत्याला या लोकसभा मतदारसंघात उतरवण्याची तयारी भाजपच्या पक्षश्रेष्ठींकडून सुरू आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल व केंद्रीय मंत्री नारायण राणे या दोन्ही नेत्यांना आता लोकसभा निवडणुकीत उतरवण्याची तयारी भाजपकडून करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. यामध्ये भागवत कराड यांचाही समावेश आहे.

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात नारायण राणे यांना उमेदवारी मिळाल्यास ही लढत तुल्यबळ होईल तसेच नारायण राणे यांचा कोकणातील संपर्क, कोकणातील अभ्यास, नारायण राणे यांचे कोकणातील अनेक नेत्यांशी असलेले घनिष्ठ संबंध या सगळ्याचा मोठा उपयोग या लोकसभा निवडणुकीत भाजपला होऊ शकतो. यापूर्वी २००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे ज्येष्ठ सुपुत्र निलेश राणे हे या मतदारसंघातून खासदार राहिले आहेत. त्यानंतर निलेश राणे यांचा दोन वेळा या मतदारसंघातून पराभव झाल्यानंतरही त्यांचा रत्नागिरी जिल्ह्यातील संपर्क कायम राहिला आहे.

राज्यसभेच्या ६ जागांसाठी २७ फेब्रुवारीला निवडणूक होत आहे. राज्यसभेतून आता पियुष गोयल व नारायण राणे हे दोघेही निवृत्त झाल्याने आता या दोघांनाही लोकसभेच्या रणांगणात उतरवले जाणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता महायुतीकडून रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून उमेदवार कोण यासाठी असलेले अन्य नावांची चर्चा आता मागे पडली आहे.


या सगळ्या पार्श्वभूमीवर आता रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे विनायक राऊत व महायुतीकडून एनटीआर म्हणजेच नारायण तातू राणे अशी लढत होईल हे जवळपास निश्चित आहे.

### किरण सामंतांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह



» केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरविले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मतदारसंघातून इच्छुक असलेले शिंदे गटाचे नेते व उद्योगमंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत यांच्या अपेक्षांवर पाणी पडणार असल्याचे मानले जाते. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना उत्तर मुंबई मतदारसंघातून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. भाजपने राज्यसभेवर निवडून आलेल्या केंद्रीय मंत्र्यांना लोकसभा निवडणुकीत उतरण्याच्या सूचना दिल्या आहेत. राणे यांच्या राज्यसभा खासदारकीची मुदत आता संपत असून त्यांना रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून निवडणूक लढवण्यासाठी तयारी करण्याची सूचना भाजप नेतृत्वाकडून देण्यात आल्याचे उच्चस्तरीय सूत्रांनी सांगितले. शिवसेना-भाजपच्या जागावाटपात हा मतदारसंघ शिवसेनेकडे होता आणि सध्या विनायक राऊत (ठाकरे गट) हे खासदार आहेत. शिवसेनेचे सर्व मतदारसंघ आपल्याला मिळावेत, अशी शिंदे गटाची मागणी आहे. पण ते देण्याची भाजपची तयारी नाही.

### उत्तर मुंबईतून पीयूष गोयल



» केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ भाजप नेते पीयूष गोयल यांना मुंबईतील सर्वांत सुरक्षित उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली जाणार आहे. भाजप, शिंदे आणि अजित पवार गटात लोकसभा मतदारसंघ वाटपाची बोलणी सुरू आहेत. विद्यामान खासदार ज्या पक्षाचा आहे, त्या पक्षाला ती जागा देण्याचे सर्वसाधारण सूत्र आहे. पण उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याकडे असलेल्या खासदारांच्या जागांवर भाजप उमेदवार उभे करण्याची तयारी करीत आहे. त्या दृष्टीनेच रत्नागिरी-सिंधुदुर्गवर भाजपने दावा केला आहे. ज्या पक्षाकडे जिंकण्याची शक्यता अधिक असलेला तगडा उमेदवार आहे, त्याला ती जागा दिली जाईल, याचाही विचार करण्यात येत असल्याचे भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले.

### राहुल शेवाळेंविरोधात अनिल देसाई?

» शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही राज्यसभा खासदार अनिल देसाई यांना लोकसभा निवडणूक रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. दक्षिण मध्य मुंबईतील शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे यांच्याविरोधात देसाई निवडणूक लढविण्याची शक्यता आहे.

# ग्रामपंचायती तुपाशी, जिल्हा परिषदा उपाशी!

## 'प्रशासकराज'मुळे जिल्हा परिषदांचा वित्त आयोगाचा निधी बंद

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचा पंधराव्या वित्त आयोगाचा निधी केंद्र सरकारने मागील तीन वर्षांपासून बंद केला आहे. प्रशासकराज असलेल्या पंचायतराज संस्थांना वित्त आयोगाचा निधी दिली जाणार नसल्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे. केंद्राच्या या भूमिकेमुळे राज्यातील २५ जिल्हा परिषदा आणि २८४ पंचायत समित्यांना या निधीपासून वंचित राहावे लागत आहे.**




यामुळे जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे मिळून सुमारे २२ हजार कोटी रुपयांच्या निधीचे नुकसान झाले आहे. यामुळे ग्रामपंचायतींना मात्र पूर्वीप्रमाणे हा निधी दिला जात आहे. या निधीच्या बाबतीत ग्रामपंचायती तुपाशी, तर, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या उपाशी असे चित्र पहावयास मिळू लागले आहे. या वृत्ताला ग्रामविकास खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. मात्र याबाबत अधिकृतपणे बोलण्यास त्यांनी नकार दिला आहे. देशातील पंचायतराज संस्थांना आपापल्या कार्यक्षेत्रातील विविध विकासकामे करण्यासाठी केंद्रीय वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून दिला जातो. देशात सध्या त्रिस्तरीय पंचायतराज पद्धती कार्यरत असून, यामध्ये जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद, तालुका पातळीवरील पंचायत समिती आणि गाव पातळीवरील ग्रामपंचायत आदी तीन संस्थांचा समावेश आहे. केंद्रीय वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या एकूण निधीपैकी ७० टक्के निधी ग्रामपंचायती, २० टक्के निधी पंचायत समित्या आणि १० टक्के निधी हा जिल्हा परिषदांना दिला जातो. मात्र पदाधिकारी कार्यरत नसलेल्या पंचायतराज संस्थांना हा निधी न देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यामुळे प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना गेल्या तीन वर्षांपासून कवडीचाही निधी मिळू शकलेला नसल्याचे पुणे जिल्हा परिषदेतून सांगण्यात आले. केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमार्फत गाव पातळीवर केल्या जाणाऱ्या विविध विकासकामांना मोठी खीळ बसली आहे. सद्यःस्थितीत पुणे जिल्हा परिषदेसह राज्यातील २५ जिल्हा परिषदा व जिल्ह्यातील तेरा पंचायत समित्यांसह २८२ पंचायत समित्यांवर प्रशासकराज आहे. पंचायत समित्यांवर १३ मार्च २०२२ तर, जिल्हा परिषदांवर २० मार्च २०२२ पासून प्रशासकराज कार्यरत आहे. केंद्रीय वित्त आयोगाची दर पाच वर्षांनी पुनर्रचना केली जाते. यानुसार १ एप्रिल २०२० पासून देशात पंधरावा वित्त आयोग चालू आहे. या आयोगाची ३१ मार्च २०२५ रोजी मुदत संपणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारने सोळाव्या वित्त आयोगाच्या अध्यक्षांच्या निवडीची घोषणाही केली आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना गेल्या तीन वर्षात पंधराव्या वित्त आयोगाचा एकूण ६४७ कोटी ८१ लाख ४८ हजार ८४४ रुपयांचा निधी मिळाला आहे. यापैकी पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यावर निम्मा निधी खर्च करण्याचे बंधन ग्रामपंचायतींवर घालण्यात आलेले आहे.देशातील पंचायतराज संस्थांना अधिकाधिक स्वायत्तता देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने ७३ वी घटनादुरुस्ती केली आहे. या घटनादुरुस्तीनंतर अस्तित्वात आलेल्या नियमांनुसार पंचायतराज संस्थांवर किमान तीन व कमाल सहा महिने कालावधीसाठीच प्रशासक नियुक्त करण्याची तरतूद आहे. मात्र या सर्व संस्थांवर मागील सुमारे दोन वर्षांपासून प्रशासकराज चालू आहे.

> "मुळात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवर प्रशासकराज येण्यासाठी सरकार जबाबदार आहे. त्रेहत्तराव्या घटनादुरूस्तीतील तरतुदीनुसार कमाल सहा महिन्यात या संस्थांची पंचवार्षिक निवडणूक घेणे सरकारवर बंधनकारक आहे. तरीही सरकारने ही तरतूद झुगारून दोन वर्षांपासून या संस्थांवर प्रशासकराज लादले आहे. त्यातच आता या संस्थांना १५ व्या वित्त आयोगाच्या निधीपासून वंचित ठेवले जात आहे. यामुळे गाव पातळीवरील विकासकामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने सर्व जिल्हा परिषदांना वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.
>
> **- वीरधवल जगदाळे,** माजी जिल्हा परिषद सदस्य, पुणे.

# स्वारगेट ट्रान्सपोर्ट हबची जागा कायमस्वरूपी मेट्रोला

## 3 हजार 941 चौरस फुटाचा भूखंड 10 वर्षांसाठी भाड्याने देण्याचा निर्णय

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**स्वारगेट येथील तब्बल १३ हजार ९४१ चौरस फुटाचा भूखंड पुणे महामेट्रोला १० वर्षासाठी भाड्याने देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता हा निर्णय रद्द करण्यात आला असून, ३८ कोटी ५४ लाख ५७ हजार रुपयांच्या बदल्यात ही जागा आता कायम स्वरुपी महामेट्रोला देण्याचा निर्णय स्थायी समितीच्या बैठकीत गुपचूप घेण्यात आला आहे.**



त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न तर बुडाले आहेच, पण मोक्याचा भूखंड देखील महापालिकेच्या हातातून गेला आहे.पुणे शहरात मेट्रोचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. सध्या वनाज ते रामवाडी आणि स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड या दोन मार्गांचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्वारगेट ते पिंपरी चिंचवड या मार्गासाठी स्वारगेट येथील जेथे चौकात भूमिगत मेट्रोस्टेशन तयार करण्यात आले आहे. पुढील काही महिन्यात हे स्टेशन सुरु होणार आहे. दरम्यान, महामेट्रोकडून स्वारगेट येथे मेट्रोचे भूमीगत स्थानक उभारले जात असतानाच या ठिकाणी पीएमपी, एसटी स्थानक यांचा समावेश करून ट्रान्सपोर्ट हब उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये व्यावसायिक गाळ्यांचाही समावेश आहे. स्वारगेट चौकातील ही जागा पाणी पुरवठा विभागाची आहे, पण मेट्रोला ही जागा देताना पर्वती टीपी स्कीम ३ मधील फायनल प्लॉट क्रमांक ४९९ व ५०० अ मधील सुमारे १३ हजार ९४१,९४ चौरसमीटर जागा भाडेकराराने देण्याचा निर्णय २०२१ मध्ये घेण्यात आला. महापालिकेच्या जागा वाटप नियमावलीनुसार, भाडे घेण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी स्थापन केलेल्या समितीने १७ जानेवारी २०२३ रोजी रेडीरेकनर दराच्या १२ टक्के वार्षिक भाडे या निश्चित केले. ही जागा १० वर्ष भाड्याने दिली जाणार असल्याने रेडिरेकनरचा दर वाढल्यानंतर भाड्यातही वाढ होणार होती. त्यामुळे महापालिकेला दरवर्षी ५ कोटी पेक्षा जास्त उत्पन्न मिळणे शक्य होते.

### मेट्रोला जागा कायम स्वरूपी हवी

» दरम्यान ही महामेट्रोला ही जागा कायम स्वरूपी हवी असल्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे २०२१ च्या रेडिरेकनरच्या दराने ३९ कोटी ५४ लाख रुपयांना ही जागा कायमस्वरूपी महामेट्रोला देण्याचा निर्णय ८ फेब्रुवारी रोजी स्थायी समिती व मुख्यसभेमध्ये घेण्यात आला आहे. ही रक्कम महापालिका देय असलेल्या रकमेतून वळती केली जाणार आहे.

# व्हॅलेंटाईन डे च्या पूर्वसंध्येला 'प्रेयसी' च्या शोधात तरुणाई एकवटली!

## चिंचवडमध्ये देवदत्त कशाळीकर यांच्या छायाचित्र प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**सुप्रसिद्ध छायाचित्रकार देवदत्त कशाळीकर यांनी सादर केलेल्या "प्रेयसी" या छायाचित्र प्रदर्शनात मंगळवारी व्हॅलेंटाईन डे च्या पूर्वसंध्येला प्रेयसीच्या शोधात तरुणाईने गर्दी केली होती. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे कलादालनात हे प्रदर्शन बुधवारी (दि.१४) रात्री नऊ वाजेपर्यंत विनामूल्य असून कलारसिकांनी प्रदर्शन पाहून आपला अभिप्राय नोंदवावा असे आवाहन आयोजक देवदत्त आणि वर्षा कशाळीकर यांनी केले आहे.**



सुप्रसिद्ध गीतकार, कवी गुरु ठाकूर यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक महेश कुडाळकर यांच्या उपस्थितीत सोमवारी या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांच्या हस्ते वर्षा कशाळीकर यांचा गौरव करण्यात आला. गुरू ठाकूर आणि वर्षा कशाळीकर यांनी या छायाचित्रांना साजेशा कविता करून बोलके केले आहे. प्रेयसी आणि निसर्ग यांचं नातं कला रसिकांसमोर मांडले आहे. स्पेशल आरकईव्ह अशा कॅनव्हास वर सप्तरंगाची मुक्त उधळण करीत अतिशय सुंदर कलाविष्कार असणारी ६० पेक्षा जास्त छायाचित्र या प्रदर्शनात आहेत. चेहऱ्याशिवाय देखील रंग, रेषा आणि नैसर्गिक प्रकाशाचा वापर करून उत्कृष्ट कलाकृती कशाळीकर यांनी सादर केली आहे. सर्वच वयोगटातील कलारासिकांना भावणारी ही छायाचित्रे महाराष्ट्र, लडाख, कर्नाटक, गोवा, गुजरात, उत्तर प्रदेशात जाऊन थंडी, ऊन, वारा, पाऊस अगांवर झेलत घेतली आहेत. या प्रदर्शनास भेट देणाऱ्या कला रसिकांनी ड्रॉप बॉक्स मध्ये आपल्या आवडत्या फोटो फ्रेमचा क्रमांक द्यावा.

ड्रॉप बॉक्स मधील एकूण तीन भाग्यवान कलारसिकांना या प्रदर्शनातील मूळ फ्रेम बुधवारी रात्री नऊ वाजता व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी प्रदर्शन स्थळी भेट देण्यात येणार आहे.

# बालवाडी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी खर्चास मान्यता!

## स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय



। पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या इयत्ता बालवाडी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पी. टी. गणवेश आणि स्वेटर खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चास आज प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती बैठकीत मान्यता दिली. या विषयासह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक सिंह यांनी मंजूरी दिली.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या प्रभाग क्र. ९ मधील महापालिका इमारतींचे व मिळकतींची स्थापत्य विषयक किरकोळ देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी तसेच इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत दिघी प्रभाग क्र. ४ मधील नियोजित मॅटर्निटी हॉस्पिटल इमारतीमध्ये विद्युत विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली. थेरगाव स्मशानभूमीतील गॅसदाहिनीचे चालन व देखभाल दुरूस्ती करण्यासाठी तसेच महापालिकेच्या अ आणि ब प्रभागातील उद्यानांची स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली. महापालिकेच्या प्रभाग क्र. २५ वाकड, ताथवडे आणि पुनावळे येथील मुख्य, अंतर्गत रस्त्यांचे व प्रभागातील इतर रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यासाठी तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पी. जी. आय सर्जरी विभागासाठी आवश्यक मशीन खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली.

### या खर्चासही मान्यता

» महापालिकेच्या शिक्षण विभागातील आणि सर्व प्राथमिक शाळांमधील प्रिंटर व संगणक यंत्रणा देखभाल दुरूस्ती करण्यासाठी तसेच ह प्रभागातील उद्यानांची स्थापत्य विषयक दुरूस्ती करण्यासाठी आणि प्रभाग क्र. १५ मधील कै. पांडुरंग काळभोर सभागृह व व्यापारी गाळे इमारतीची दुरूस्ती व नुतनीकरण करण्यासाठी आणि प्रभाग क्र. ६ मध्ये धावडे वस्ती व परिसरातील देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली. महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या मिळकतकर संगणक प्रणालीची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व प्रणाली अद्ययावत ठेवण्याच्या कामकाजाकरिता तीन अतिरिक्त सॉफ्टवेअर डेव्हलपर उपलब्ध करून देण्यासाठी तसेच १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यासाठी येणाऱ्या खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली.







**लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर निरंकुश सत्ता उपभोगायची आणि लोकशाही मार्गानेच पराभव झाल्यानंतर मात्र, या व्यवस्थेची प्रतीके उद्ध्वस्त करण्यास निघायचे, असे आधुनिक 'टूलकिट' गेल्या काही वर्षांमध्ये दोन नेत्यांनी ठळकपणे आचरले. यांतील एक आहेत अमेरिकेचे माजी आणि इच्छुक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प. दुसरे आहेत ब्राझीलचे माजी, पराभूत अध्यक्ष जाइर बोल्सोनारो.**

# ब्राझीलचा 'उठावखोर' गोत्यात!



या दोघांच्या कृत्यामध्ये एक मूलभूत फरक मात्र आहे. ट्रम्प यांनी निवडणूक निकाल जाहीर होऊ लागताच आकांडतांडव केले. निकालांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्याविषयी शंका उपस्थित करण्यास सुरुवात केली आणि पराभव सुनिश्चित झाल्यानंतर अमेरिकी कायदेमंडळाच्या इमारतीवर आपल्या समर्थकांना चाल करून जाण्यास चिथावले. ब्राझीलची अध्यक्षीय निवडणूक त्या घटनेनंतर (६ जानेवारी २०२१) जवळपास वर्षभराने झाली. त्या निवडणुकीत पराभव होणार याची आधीच चाहूल लागल्यामुळे, ही निवडणूकच मोठा घोटाळा असल्याची बोगस माहिती बोल्सोनारो समर्थकांमार्फत पसरवली गेली. जेणेकरून त्या एका कारणास्तव निवडणूक प्रक्रियेतील लष्करी हस्तक्षेप समर्थनीय ठरावा. या प्रयत्नांमध्ये काही लष्करी अधिकारी, पोलीस अधिकारी, गुन्हेगारी टोळ्या सहभागी असल्याचा निष्कर्ष ब्राझीलच्या पोलिसांनी काढला. या पोलिसांना तपासाचा सर्वाधिकार ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाकडून बहाल झाला आहे. यासंदर्भात गेल्या आठवड्याभरात विविध ठिकाणी छापासत्र झाले, काही जणांना अटक करण्यात आली. उठाव करून ब्राझीलमधील लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा कट होता. अशा अस्थिर वातावरणात त्यावेळी अध्यक्ष असलेले बोल्सोनारो यांचा प्रदीर्घकाळ सत्तेवर राहण्याचा मार्ग मोकळा होणार होता.ऑक्टोबर २०२२मध्ये झालेली निवडणूक बोल्सोनारो हरले. ही निवडणूक प्रदीर्घ काळ लांबली आणि अंतिम निवडीसाठी फेरनिवडणुकीचा मार्ग अवलंबावा लागला होता. पण पराभव झाल्यानंतर काही दिवसांनी, विशेषतः ८ जानेवारी २०२३ रोजी राजधानी ब्रासिलिया शहरात बोल्सोनारो समर्थकांनी धुडगूस घातला. त्यांना लष्कराकडून अपेक्षित समर्थन मिळाले नाही.तरीदेखील अध्यक्षीय प्रासाद, कायदेमंडळाची इमारत, सर्वोच्च न्यायालयाची इमारत अशा महत्त्वाच्या ठिकाणांवर हे समर्थक चाल करून गेले. बोल्सोनारो या उठावखोरीमध्ये सकृद्दर्शनी दोषी आढळले आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यास त्यांना २९ वर्षांचा कारावास होऊ शकतो. आपण निर्दोष असल्याचे आणि आपला छळ सुरू असल्याचे ते आजही सांगतात. मात्र पोलीस तपासास साह्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली असून, पारपत्रही पोलिसांच्या हवाली केले आहे. गतवर्षी ब्राझीलियन काँग्रेसच्या एका समितीने त्यांना उठावखोरीप्रकरणी दोषी ठरवले. तत्पूर्वी एका न्यायालयाने याच कारणास्तव त्यांच्यावर २०३०पर्यंत कोणतीही निवडणूक लढवण्यावर बंदी आणली. बोल्सोनारो यांचे आदर्श डोनाल्ड ट्रम्प! गतवर्षी निवडणूक हरल्यानंतर ते अमेरिकेतच ट्रम्प यांचा पाहुणचार घेण्यासाठी गेले होते. रीतसर झालेल्या निवडणुकीच्या सत्यतेविषयी चुकीची माहिती पसरवायची, समर्थकांना चिथावून रस्त्यावर आणायचे आणि लोकशाहीच्या प्रतीकांवर चाल करून जायची हा धक्कादायक प्रकार अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच ६ जानेवारी २०२१ रोजी घडला होता. असे उठाव आणि जानेवारी महिना हे ट्रम्प यांच्याप्रमाणेच बोल्सोनारो यांनाही आदर्शवत वाटले असावेत. पण अमेरिकेइतकी ब्राझीलची न्याय व तपास यंत्रणा गोंधळलेली दिसत नाही.अमेरिकेमध्ये तर विविध न्यायालयांमध्ये ट्रम्प यांच्याविरुद्ध उठावखोरीचा खटला दाखल करण्यावरच एकमत होत नाही. त्यांनी अशी कृती केली- म्हणजे चिथावणी दिली त्यावेळी ते अध्यक्ष होते. अशा व्यक्तीस काही स्वरूपाच्या गुन्ह्यांपासून पदसिद्ध संरक्षण मिळते किंवा कसे यावरच तेथे अजून खल सुरू आहे. तशात अमेरिकी अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ट्रम्पच उतरवले जातील.

## संपादकीय »

### अशोकरावांचा 'आदर्श'!

***कोकणात ज्याप्रमाणे राणे पिता-पुत्रास भाजपने आपल्यात घेतले त्याप्रमाणे मराठवाड्यात अशोकरावांचे झाले, त्यांच्या साथीने आणखी आमदार गेले तरी नवल नाही...***

आजमितीस अभिनंदन अशोक चव्हाण यांचे करावे की भाजपचे हा सर्वात मोठा गहनगंभीर प्रश्न ठरतो. अशा परिस्थितीत ते दोघांचेही करणे इष्ट. हे दोनही घटक अभिनंदनास तितकेच पात्र ठरतात. अशोक चव्हाण यांनी एकदा काय तो निर्णय घेतला, हे बरे झाले. त्यासाठी ते अभिनंदनीय. महाराष्ट्रात कोणीही फुटणार अशी वदंता आली की पहिल्यांदा गेली काही वर्षे अशोकरावांचे नाव घेतले जायचे. म्हणजे फुटणारी व्यक्ती अशोक चव्हाण असेल याची खात्री राजकारणाच्या व्हॉट्सॲपी निरीक्षकांसही होती. हा जसा या निरीक्षकांच्या चाणाक्षतेचा मोठेपणा तशीच ती अशोक चव्हाण यांच्या विश्वासार्हतेचीही 'पावती'च म्हणायची. दुसरीकडे भाजपचे अभिनंदन करण्याचे कारण सोमवारच्या ताज्या घटनेपुरतेच मर्यादित असणार नाही. जेव्हा अशोकराव भाजपत जातील त्या वेळी ही घटनामालिका पूर्ण होईल.

यंदाच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा असतील, ही अपेक्षा खोटी ठरवून देश मजबूत करण्यासाठी सिमेंट, ऊर्जानिर्मिती, कोळसा या उद्योगांना तसेच अन्य नवउद्योगांना मदतगार ठरणारे निर्णय सरकारने घेतले. गरीबांसाठी सौरऊर्जा, घरांसाठी साह्य आणि आरोग्य विम्यासारख्या सुविधांची व्याप्ती वाढवण्याचा विचारही यंदा दिसून आला.

# लोकानुनय नव्हे; देशाची उभारणी!

दशकभरापूर्वी वित्तभांडवलाच्या जागतिक क्षेत्रात कायकाय कूट-शब्द वापरले जात, हे जरा आठवून पाहा- 'फ्रॅजाइल फाइव्ह' आणि 'पीआयआयजीएस' म्हणजे 'पीग्ज' हे चटकन आठवतील. यापैकी दुसरा शब्द हा मुख्यत: युरोपातल्या कर्जबाजारी देशांसाठी वापरला गेला, पण अतिनाजूक पाचांमध्ये (फ्रॅजाइल फाइव्ह) भारताचाही समावेश त्या वेळी केला जाई. कारण, ज्या अर्थव्यवस्था नुकत्या वाढू लागलेल्या असूनही इतरांवर फार अवलंबून होत्या आणि त्यामुळे बेभरवशी होत्या, त्यात आपणही मोजले जात होतो- हे सारे, द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधानपदी असताना आणि त्यांचे अर्थमंत्रीसुद्धा बुद्धिवंत असताना होत होते. या खिन्न अवस्थेतून आणि आर्थिक स्तब्धतेपासून ते 'जगातील एकमेव उज्ज्वल स्थाना'पर्यंतच्या प्रवासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. पुढील काही महिन्यांत आपण सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जात



असताना, अर्थव्यवस्थेची हाताळणी हा पंतप्रधानांच्या प्रगतीपुस्तकातील सर्वात तेजस्वी तारा आहे. हा आर्थिक संदर्भ आणि त्यातून येणारा राजकीय आत्मविश्वास यंदाच्या लेखानुदानातही (हंगामी अर्थसंकल्पातही) दिसून आला.लोकानुनयी अर्थसंकल्पाचीच अपेक्षा साऱ्यांना असूनसुद्धा, भारताचे दीर्घकालीन फायदे शीर्षस्थानी ठेवण्याच्या आपल्या ध्येयावर सरकार यंदा ठाम राहिले. याला हे देऊ कर, त्या गटाला ते आश्वासन दे, अशा अल्प-मुदतीच्या निवडणूक लाभांच्या दबावाखाली हे लेखानुदान आलेले नाही. याउलट, विकसित भारताचा मार्ग ज्या पायावर भक्कमपणे उभारला जाईल, असा पायाच लेखानुदानाने मजबूत केलेला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात, शाश्वत आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदल दिसून आले आहेत. त्यातही विशेष म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. या पायाभूत सुविधा फक्त अभियांत्रिकीपुरत्या नसून सामाजिक आणि डिजिटलही आहेत. ताज्या अर्थसंकल्पातही हे सूत्र कायम राहिले आहे. पायाभूत सुविधांवरील खर्चात आणखी ११.११ टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे, परिणामी ११.११लाख कोटी रुपये या क्षेत्राला मिळणार असून, एकंदर पायाभूत सुविधांची तरतूद यामुळे गेल्या चार वर्षांत तिप्पट झालेली आहे! पायाभूत सुविधांमध्येही यंदा रेल्वेवर भर देण्यात आला आहे. बंदरांशी जोडलेली वाहतूक-व्यवस्था, अत्यंत वर्दळीची रहदारी हे लक्षात घेऊन आणि ऊर्जा, खनिजे आणि सिमेंट क्षेत्रांसाठी उभारले जाणारे रेल्वेचे खास कॉरिडॉर मालवाहतुकीचा दर्जा आणि वेग सुधारतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# चव्हाणांना पटोलेंची खुली ऑफर!

## एखादा नेता गेल्याने पक्षावर काहीही फरक पडत नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्य सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर आता भाजपात प्रवेश केला आहे. भाजपाचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार आदी नेत्यांच्या उपस्थितीत चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला. दरम्यान, याच पक्षप्रवेशावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली. अशोक चव्हाण यांची भाजपात दुर्दशा होणार आहे. त्यांना तेथे नेतृत्व करायला मिळणार नाही. आमची त्यांना अजूनही ऑफर आहे.**



त्यांनी काँग्रेसमध्ये परत यावे, असे नाना पटोले म्हणाले. ते एएनआय या वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीशी बोलत होते."काँग्रेस हा सामान्य लोकांचा पक्ष आहे. एखादा नेता गेल्याने पक्षावर काहीही फरक पडत नाही. भाजपाने केलेल्या सर्वेक्षणात ते स्वत:च पिछाडीवर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ते असे छोटे-छोटे प्रयत्न करत आहेत. मात्र यामुळे लोकांच्या मनात काँग्रेसप्रती सहानुभूती वाढली आहे. मला वाटतं की काँग्रेसचा आणखी जास्त जागांवर विजय होईल. अशोक चव्हाण जाण्याने काँग्रेसवर काहीही परिणाम पडणार नाही," असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला.अशोक चव्हाण काँग्रेसच्या काही नेत्यांवर नाराज होते. यामध्ये नाना पटोले यांचादेखील समावेश होता, असे म्हटले जात आहे. यावर बोलताना "अशोक चव्हाण यांना काँग्रेस पक्षात फार सन्मान दिला जायचा. मात्र दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारने श्वेतपत्रिका जारी केली. यामध्ये अशोक चव्हाण आरोपी असलेल्या आदर्श घोटाळ्याचा उल्लेख करण्यात आला. आता आदर्श घोटाळ्यात कोण होतं, हे सर्वांनाच माहिती आहे. ते स्वत:च्या चुका दुसऱ्यांच्या माथी मारत आहेत. मात्र अशोक चव्हाण यांना काँग्रेसमध्ये फार सन्मान दिला जायचा. अशोक चव्हाण यांना आमच्यावर आरोप करायचे असतील तर ते करू शकतात," असे स्पष्टीकरण नाना पटोले यांनी दिले.अशोक चव्हाण यांना आम्ही पक्षातून काढलेले नाही. ते स्वत:हून भाजपात गेले आहेत. त्यामुळे आम्ही तर त्यांना म्हणत आहोत की, अजूनही काहीही बिघडलेले नाही. अशोक चव्हाण यांची नेतृत्व करण्याची भूमिका राहिलेली आहे. भाजपात त्यांना नेतृत्व करण्याची संधी दिली जाणार नाही. भाजपात आतापर्यंत किती नेत्यांना अडगळीत टाकण्यात आलेले आहे, हे सर्वांनाच माहिती आहे. नारायण राणे, हर्षवर्धन पाटील यांची सध्या काही परिस्थिती आहे, हे सगळेच पाहात आहेत. अशोक चव्हाण यांचा भाजपा प्रवेश अमित शाहांच्या उपस्थितीत झाला असता तर त्यांना थोडा सन्मान तरी मिळाला असता. म्हणजेच अशोक चव्हाण यांना अडगळीत टाकण्यास आजपासूनच सुरुवात झालेली आहे. नेतृत्व करणाऱ्या नेत्याची अशी दुर्दशा होऊ नये म्हणूनच आम्ही त्यांना काँग्रेसमध्ये परत येण्याची ऑफर दिलेली आहे," असे नाना पटोले यांनी स्पष्ट केले. अशोक चव्हाण यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाचे नेते आशिष शेलार यांच्या उपस्थितीत भाजपाचा प्रवेश झाला. यावेळी बोलताना काँग्रेस पक्ष सोडण्याचा हा माझा वैयक्तिक निर्णय आहे. मला कोणीही जबरदस्ती केलेली नाही.

### काँग्रेसमध्ये सन्मान दिला जायचा

तसेच भाजपामध्ये प्रवेश करताना मी कोणतीही मागणी केलेली नाही, असे अशोक चव्हाण यांनी सांगितले. काँग्रेसमध्ये परत यावे, असे नाना पटोले म्हणाले. ते एएनआय या वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीशी बोलत होते."काँग्रेस हा सामान्य लोकांचा पक्ष आहे. एखादा नेता गेल्याने पक्षावर काहीही फरक पडत नाही. भाजपाने केलेल्या सर्वेक्षणात ते स्वत:च पिछाडीवर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ते असे छोटे-छोटे प्रयत्न करत आहेत. मात्र यामुळे लोकांच्या मनात काँग्रेसप्रती सहानुभूती वाढली आहे. मला वाटतं की काँग्रेसचा आणखी जास्त जागांवर विजय होईल. अशोक चव्हाण जाण्याने काँग्रेसवर काहीही परिणाम पडणार नाही," असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला. अशोक चव्हाण काँग्रेसच्या काही नेत्यांवर नाराज होते. यामध्ये नाना पटोले यांचादेखील समावेश होता, असे म्हटले जात आहे. यावर बोलताना "अशोक चव्हाण यांना काँग्रेस पक्षात फार सन्मान दिला जायचा. मात्र दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारने श्वेतपत्रिका जारी केली. यामध्ये अशोक चव्हाण आरोपी असलेल्या आदर्श घोटाळ्याचा उल्लेख करण्यात आला. आता आदर्श घोटाळ्यात कोण होतं, हे सर्वांनाच माहिती आहे. ते स्वत:च्या चुका दुसऱ्यांच्या माथी मारत आहेत. मात्र अशोक चव्हाण यांना काँग्रेसमध्ये फार सन्मान दिला जायचा. अशोक चव्हाण यांना आमच्यावर आरोप करायचे असतील तर ते करू शकतात," असे स्पष्टीकरण नाना पटोले यांनी दिले.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही आदित्यनाथांना सुनावलं

## शरद पवार यांनी जे वक्तव्य केलं तसंच वक्तव्य अजित पवार यांनीही केलं

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी आळंदीत झालेल्या एका कार्यक्रमात समर्थ रामदास हे छत्रपती शिवरायांचे गुरु होते. त्यांच्यामुळेच छत्रपती शिवरायांना पुढील कार्य करता आलं असा दावा केला होता. योगी आदित्यनाथ जे बोलले त्यानंतर राज्यभरातल्या शिवप्रेमींकडून संताप व्यक्त झाला.**



इतकंच नाही तर शरद पवार यांनीही योगी आदित्यनाथ यांनी केलेला हा दावा बरोबर नाही असं म्हटलं आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरु या जिजाऊच होत्या या गोष्टीचा पुनरुच्चार केला. आता उपमुख्यमंत्री आणि शरद पवारांचे पुतणे अजित पवार यांनीही असेच खडे बोल योगी आदित्यनाथांना सुनावले आहेत. राजमाता जिजाऊंनी शिवाजी महाराजांची जडणघडण केली असं ठामपणे अजित पवार यांनी सांगितलं. शरद पवारांनी जसं योगी आदित्यनाथ यांना खडे बोल सुनावले त्याच पद्धतीने अजित पवार यांनीही ठामपणे ही बाब आपल्या वक्तव्यातून अधोरेखित केली. तसंच योगी आदित्यनाथ यांच्या वक्तव्याचं खंडन केलं.मला आज पावन आळंदी भूमीत येण्याचं भाग्य लाभलं. मी सनातन धर्मासाठी काम करत आलो आहे. आज ज्ञानेश्वर महाराजांच्या भूमीपुढे मी नतमस्तक आहे. अगदी लहान होते तेव्हा ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी वाचली. तेव्हापासून आळंदीत येण्याची इच्छा होती. ती आज पूर्ण झाली आहे." पुढे ते म्हणाले, "महाराष्ट्रात एकाच कुटुंबात चार संत होऊन गेले. त्यांचा आशीर्वाद आपल्याला शेकडो वर्षांपासून मिळतो आहे.

### महाराजांच्या गुरु या जिजाऊच

याच महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांना रामदास स्वामी यांनी घडवलं. त्यांनी औरंगजेबच्या सत्तेला आव्हान दिले. औरंगजेबला असे मारले की आजपर्यंत औरंगजेबला कोणी विचारलं नाही. महाराष्ट्र ही शौर्य आणि पराक्रमाची भूमी आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी आळंदीत झालेल्या एका कार्यक्रमात समर्थ रामदास हे छत्रपती शिवरायांचे गुरु होते. त्यांच्यामुळेच छत्रपती शिवरायांना पुढील कार्य करता आलं असा दावा केला होता. योगी आदित्यनाथ जे बोलले त्यानंतर राज्यभरातल्या शिवप्रेमींकडून संताप व्यक्त झाला. इतकंच नाही तर शरद पवार यांनीही योगी आदित्यनाथ यांनी केलेला हा दावा बरोबर नाही असं म्हटलं आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरु या जिजाऊच होत्या या गोष्टीचा पुनरुच्चार केला.

# रायबरेलीवर काँग्रेसचंच वर्चस्व !

## सोनिया गांधींचा लोकसभा निवडणूक लढवण्यास स्पष्ट नकार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी बुधवारी (13 फेब्रुवारी) राज्यसभेसाठी उमेदवारी दाखलकरणार आहेत. यापूर्वी ही ऑफर प्रियांका गांधी यांना देण्यात आली होती, मात्र त्यांनी राज्यसभा निवडणूक लढण्यास स्पष्ट नकार दिला होता. दरम्यान, सोनिया गांधी सध्या उत्तर प्रदेशातील रायबरेली मतदारसंघातील लोकसभेच्या खासदार आहेत.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी राजस्थान किंवा हिमाचल प्रदेशमधून राज्यसभेसाठी उमेदवारी दाखल करू शकतात. त्याचबरोबर काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ असलेल्या रायबरेलीतून काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी लोकसभा निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती मिळत आहे. सोमवारी (12 फेब्रुवारी) काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या 2024 च्या जागा वाटपाबाबत इंडिया आघाडीतील सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली होती. यावेळी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि प्रियांका गांधी यांना राज्यसभेतून सभागृहात पाठवावं, अशी चर्चा झाली. मात्र, या बैठकीत प्रियंका गांधींनी राज्यसभेची ऑफर नाकारली असल्याची माहिती मिळत आहे. तसेच, सोनिया गांधी राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करणार असल्याची माहिती मिळत आहे. तर गांधी कुटुंबाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायबरेलीमधून प्रियांका गांधी लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. यापूर्वी सोनिया गांधी यांनी 2019 मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळीच सांगितलं होतं की, ही निवडणूक त्यांची शेवटची निवडणूक असणार आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी 1999 पासून लोकसभेच्या सदस्य आहेत. यंदा पहिल्यांदाच त्या राज्यसभेवर जाणार आहेत. सोनिया गांधी सध्या उत्तर प्रदेशातील रायबरेलीच्या खासदार आहेत. रायबरेलीची जागा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखली जाते. गेली अनेक दशकं या जागेवर काँग्रेसचंच वर्चस्व आहे. गेल्या चार निवडणुकांत सोनिया येथून विजयी होत आहेत. येथील प्रत्येक निवडणुकीत त्यांना 50 टक्क्यांहून अधिक मतं मिळाली आहेत. देशात आतापर्यंत झालेल्या 17 लोकसभा निवडणुकांमध्ये 3 निवडणुका वगळता ही जागा प्रत्येक वेळी काँग्रेसकडे आहे. देशाच्या 72 वर्षांच्या निवडणुकीच्या इतिहासात उत्तर प्रदेशची रायबरेली ही जागा 66 वर्षांपासून काँग्रेसकडेच आहे. दरम्यान, एप्रिल-मे 2024 मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणूक लढणं आणि त्यासाठी प्रचार करणं प्रकृती अस्वास्थामुळे सोनिया गांधींना शक्य नसल्याचं बोललं जात आहे. सोनिया गांधींच्या लोकसभा निवडणूक लढवण्यावरुन सध्या अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, सोनिया गांधी जर राज्यसभेवर जाणार असतील, तर त्यांचा मतदारसंघ उत्तर प्रदेश रायबरेलीमधून लोकसभेसाठी काँग्रेसमधून कोणाची वर्णी लागू शकते? यावरही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. जर सोनिया गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार नाहीत, तर तिथून कोण निवडणूक लढवणार? तिथून त्यांची मुलगी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका वाड्रा गांधी यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. सोमवारी (12 फेब्रुवारी) काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या 2024 च्या जागा वाटपाबाबत इंडिया आघाडीतील सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली होती. यावेळी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि प्रियांका गांधी यांना राज्यसभेतून सभागृहात पाठवावं, अशी चर्चा झाली. मात्र, या बैठकीत प्रियंका गांधींनी राज्यसभेची ऑफर नाकारली असल्याची माहिती मिळत आहे. तसेच, सोनिया गांधी राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करणार असल्याची माहिती मिळत आहे. ही निवडणूक त्यांची शेवटची निवडणूक असणार आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी 1999 पासून लोकसभेच्या सदस्य आहेत. यंदा पहिल्यांदाच त्या राज्यसभेवर जाणार आहेत. सोनिया गांधी सध्या उत्तर प्रदेशातील रायबरेलीच्या खासदार आहेत.

### काँग्रेसमधून कोणाची वर्णी

» रायबरेलीची जागा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखली जाते. गेली अनेक दशकं या जागेवर काँग्रेसचंच वर्चस्व आहे. गेल्या चार निवडणुकांत सोनिया येथून विजयी होत आहेत. येथील प्रत्येक निवडणुकीत त्यांना 50 टक्क्यांहून अधिक मतं मिळाली आहेत. देशात आतापर्यंत झालेल्या 17 लोकसभा निवडणुकांमध्ये 3 निवडणुका वगळता ही जागा प्रत्येक वेळी काँग्रेसकडे आहे. देशाच्या 72 वर्षांच्या निवडणुकीच्या इतिहासात उत्तर प्रदेशची रायबरेली ही जागा 66 वर्षांपासून काँग्रेसकडेच आहे. दरम्यान, एप्रिल-मे 2024 मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणूक लढणं आणि त्यासाठी प्रचार करणं प्रकृती अस्वास्थामुळे सोनिया गांधींना शक्य नसल्याचं बोललं जात आहे. सोनिया गांधींच्या लोकसभा निवडणूक लढवण्यावरुन सध्या अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, सोनिया गांधी जर राज्यसभेवर जाणार असतील, तर त्यांचा मतदारसंघ उत्तर प्रदेश रायबरेलीमधून लोकसभेसाठी काँग्रेसमधून कोणाची वर्णी लागू शकते? यावरही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. जर सोनिया गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार नाहीत, तर तिथून कोण निवडणूक लढवणार? तिथून त्यांची मुलगी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका वाड्रा गांधी यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती.

---

# माजी नौदल जवानांच्या सुटकेसाठी शाहरुखची मध्यस्थी?

## सुब्रह्मण्यम स्वामींच्या दाव्यावर 'किंग खान'ने सोडले मौन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कतारमध्येइस्रायलसाठी हेरगिरी करत असल्याच्या आरोपात मृत्युदंडाची शिक्षा सुनावलेल्या सर्व आठ माजी नौदल अधिकाऱ्यांची सुटका झाली. त्यांच्या या सुटकेसाठी बॉलिवूडचा किंग शाहरुख खानने ) मध्यस्थी केली असल्याचा दावा करण्यात येत आहे.**

भारत सरकारच्या अधिकाऱ्यांना चर्चेत अपयश आल्याने कतारच्या प्रिन्ससोबत शाहरुखने चर्चा केली असल्याचा दावा सोशल मीडियावर करण्यात येत होता. त्यानंतर आता शाहरुख खानने या प्रकरणावर आपले मौन सोडले आहे. भाजप नेते आणि माजी राज्यसभा खासदार सुब्रह्मण्यम स्वामी यांच्या नावाने सोशल मीडियावर दावा करण्यात येत आहे. भारतीय नौदलाच्या माजी अधिकाऱ्यांना कतारने अटक केली होती. अटक करण्यात आलेले आठ अधिकारी इस्रायलची गुप्तचर संस्था 'मोसाद'साठी काम करत असल्याचा ठपका ठेवण्यात आला. कतार कोर्टाने त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली. त्यानंतर भारतीय



परराष्ट्र खात्याकडून या नौदलाच्या माजी अधिकाऱ्यांच्या सुटकेचे प्रयत्न केले. सोशल मीडियावरील दाव्यानुसार, परराष्ट्र अधिकाऱ्यांना कतार सरकारला माजी नौदल अधिकाऱ्यांच्या सुटकेसाठी अपयश आलेमाजी नौदल अधिकाऱ्यांच्या सुटकेचे यश हे शाहरुखचे असून मोदी सरकारचे नसल्याचा दावा सोशल मीडियावर सुब्रह्मण्यम स्वामी यांनी केला. आपली भूमिका आणि योगदानाबाबत झालेल्या चर्चेवर शाहरुख खानने त्याची मॅनेजर पूजा ददलानी मार्फत एक निवेदन जारी करून अशा बातम्यांना अफवा आणि त्या निराधार असल्याचे म्हटले आहे. शाहरुखने आपल्या निवेदनात म्हटले की, भारतीय नौदलाच्या माजी अधिकाऱ्यांच्या सुटकेसाठी भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

### सुरक्षा एजन्सींची स्थानिक भागिदार

» भारताचे नेत्यांनी केलेल्या मुत्सुद्देगिरीला यश आले असल्याचे शाहरुखने म्हटले. कतारमधून माजी नौदल अधिकाऱ्यांची सुटका झाल्यानंतर सर्व भारतीयांप्रमाणे आपल्यालाही आनंद झाला असून सुखरूप घरी परतावे या सदिच्छा असून आणि त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा देत असल्याचे शाहरूख खानने म्हटले. कतारमध्ये गंभीर आरोपांखाली नौदल अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. शिक्षा सुनावण्यात आलेले माजी नौसैनिक दाहरा ग्लोबल टेक्नोलॉजीस अँड कन्सलटन्सी सर्विसेसमध्ये काम करत होते. या कंपनीकडे सैन्य दलांना उपयुक्त असणारी यंत्र पुरवली जातात. शिवाय ही कंपनी सुरक्षा एजन्सींची स्थानिक भागिदार देखील आहे.

# श्रेयसच्या पत्नीच्या सतत संपर्कात होता अक्षय कुमार

गेल्या वर्षी 14 डिसेंबरला बॉलिवूड अभिनेता श्रेयस तळपदेला हृदयविकाराचा झटका आला. अँजिओप्लास्टीनंतर बरा झालेला 48 वर्षीय श्रेयस आता कामावर परतला आहे. नुकत्याच एका मुलाखतीत, अभिनेता आणि त्याच्या पत्नीने सांगितले की या कठीण काळात मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील कितीतरी कलाकार त्यांच्या पाठीशी उभे आहेत.एबीपी मांझाला दिलेल्या मुलाखतीत श्रेयसची पत्नी दीप्ती तळपदेने सांगितले की, या काळात अक्षय कुमार श्रेयसच्या आरोग्याचे अपडेट्स घेत राहिला. श्रेयसला चांगल्या रुग्णालयात हलवण्याचा आग्रहही त्यांनी धरला होता. दीप्तीने असेही सांगितले की त्याच रात्री चित्रपट निर्माते अहमद खानदेखील पत्नीसोबत रुग्णालयात भेटायला आले होते.दीप्ती म्हणाली, 'जेव्हा श्रेयसला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले तेव्हा रात्री 11 वाजता दिग्दर्शक अहमद खान पत्नीसोबत हॉस्पिटलमध्ये आले. ते माझ्यासोबत होते. यादरम्यान अक्षय कुमारही श्रेयसच्या तब्येतीचे अपडेट्स घेत राहिला. श्रेयसला चांगल्या हॉस्पिटलमध्ये हलवण्याबाबतही तो बोलला. दुसऱ्या दिवशी सकाळीही त्याचा फोन आला.




तो म्हणाला प्लीज मला त्याला दोन मिनिटे भेटू द्या. मी म्हणाले तुला पाहिजे तेव्हा भेटू शकतोस. संपूर्ण हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टी त्या दिवशी आमच्यासोबत होती. यापूर्वी श्रेयसने एका मुलाखतीत हृदयविकाराच्या झटक्याबद्दल सांगितले होते. काही काळापासून ते वैद्यकीयदृष्ट्या मृत झाल्याचे त्यांनी सांगितले होते. हा त्याचा दुसरा जन्म आहे.वर्क फ्रंटवर, श्रेयसच्या अनोखी गाठ या मराठी चित्रपटाचा ट्रेलर सोमवारीच प्रदर्शित झाला. 1 मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. याशिवाय श्रेयस मल्टीस्टारर 'वेलकम टू द जंगल' आणि कंगना रनोटच्या 'इमर्जन्सी'मध्येही दिसणार आहे.यादरम्यान अक्षय कुमारही श्रेयसच्या तब्येतीचे अपडेट्स घेत राहिला. श्रेयसला चांगल्या हॉस्पिटलमध्ये हलवण्याबाबतही तो बोलला. दुसऱ्या दिवशी सकाळीही त्याचा फोन आला.

## आता हुकुमाचा एक्का काढला

अनेक दिवसांपासून एकामागून एक फ्लॉप चित्रपट देणाऱ्या कंगना रनौतने आता हुकुमाचा एक्का बाहेर काढला आहे. कंगनाला मागील काही चित्रपटांपासून बॉक्स ऑफिसवर अपयश पाहावे लागत आहे. आपल्या चित्रपटाकडे पाठ फिरवणाऱ्या प्रेक्षकांना पुन्हा तिकीटबारीकडे वळवण्यासाठी कंगनाने जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. कंगनाने आता आर. माधवन (R. MADHAVAN) सोबत चित्रपट करणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे 'तनु वेड्स मनु रिटर्न्स'या सुपरहिट चित्रपटातील जोडी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. माधवनसोबत काम करणार असल्याची माहिती कंगना रनौतने सोशल मीडियावर युजर्ससोबत शेअर केली आहे. कंगना रनौतने इंस्टाग्राम स्टोरीवर आर माधवनसोबतचा तिचा सेल्फी शेअर केला आहे. या सेल्फीसोबत तिने कॅप्शनही लिहिले आहे.

## जॅकलिनला धमक्या



बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसने फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखरविरोधात दिल्लीचे पोलिस आयुक्त संजय अरोरा यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. तिने सुकेशवर छळ आणि धमक्या दिल्याचा आरोप केला आहे.इंडियन एक्सप्रेसमधील वृत्तानुसार, जॅकलिनने काही दिवसांपूर्वी पोलिस आयुक्त संजय अरोरा आणि विशेष पोलिस आयुक्तांना मेल पाठवला आहे. त्या मेलमध्ये तिने साक्षीदारांच्या संरक्षणात यंत्रणेच्या अपयशाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. या प्रकरणात आपण साक्षीदार आहोत, तरीही त्यांच्यावर मानसिक दबाव टाकला जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना धमक्याही येत आहेत पुढे लिहिले की, मी एक जबाबदार नागरिक आहे. असे असूनही, मी अशा प्रकरणामध्ये अडकत आहे ज्यामुळे माझे भविष्य धोक्यात आले आहे.जॅकलिनने या मेलसोबत तीन वृत्तपत्रातील लेखही जोडले आहेत, ज्यात सुकेशने लिहिलेल्या पत्राची छायाचित्रे होती. सुकेश हा ठग असून तुरुंगात असल्याचे तिने लिहिले आहे. असे असतानाही तो तुरुंगातून जाहीरपणे धमक्या देत आहे. तसेच मानसिक छळ करत आहे. जॅकलीनने लिहिले आहे की, या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ आयपीसी कलमांतर्गत एफआयआर नोंदवावा. सुकेशने असे केल्याने केवळ तिची सुरक्षाच धोक्यात येत नाही .

## लाल सलाम'पेक्षा 'ईगल'चे कलेक्शन सरस

पहिल्या वीकेंडला 27 कोटी रुपये कमावल्यानंतर सोमवारी शाहिद-क्रिती स्टारर चित्रपट 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया'च्या कमाईत 65% ची घसरण झाली आहे. रविवारी या चित्रपटाने 10 कोटी 75 लाख रुपयांचे चांगले कलेक्शन केले होते, तर पहिल्या सोमवारी म्हणजेच कामकाजाच्या दिवशी केवळ 3 कोटी 75 लाख रुपयांचा व्यवसाय केला. आता 4 दिवसांत या चित्रपटाचे भारतीय बॉक्स ऑफिस कलेक्शन 30 कोटी 85 लाखांवर पोहोचले आहे.पहिल्या दिवसापासून या चित्रपटाला देशभरातील चेन्नईमधील चित्रपटगृहांमधून सर्वाधिक व्यवसाय मिळत आहे. रविवारी, चेन्नईमध्ये चित्रपटाच्या केवळ 44 शोमध्ये 71.75% ची ऑक्युपेन्सी पाहिली गेली. सोमवारी, त्याच्या 43 शोची ऑक्युपेन्सी 37.33% होती. बॉलीवूड चित्रपट असूनही हा चित्रपट साऊथमध्ये चांगली कामगिरी करत आहे.मात्र, या चित्रपटाने देशातच नव्हे तर परदेशातही चांगला व्यवसाय केला आहे. या चित्रपटाने तिसऱ्या दिवशी जगभरात 21 कोटींची कमाई केली. यासह याने 3 दिवसांत जगभरात 55 कोटी 10 लाख रुपयांचा व्यवसाय केला आहे.याआधी हा चित्रपट शाहिद आणि क्रितीच्या करिअरमधील पहिल्या वीकेंडला सर्वाधिक कमाई करणारा 7वा चित्रपट ठरला आहे. शाहिद कपूरच्या 'पद्मावत' चित्रपटाने पहिल्या वीकेंडमध्ये सर्वाधिक कलेक्शन केले आहे. क्रितीच्या कारकिर्दीतील सर्वात जास्त पहिल्या वीकेंड कलेक्शनचा चित्रपट म्हणजे 'आदिपुरुष'. 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' या चित्रपटात शाहिद आणि क्रितीशिवाय धर्मेंद्र, डिंपल कपाडिया आणि राकेश बेदीसारखे कलाकारही दिसत आहेत.

## 'भूल भुलैया 3'मधून मंजुलिका पुनरागमन करणार



बॉलिवूडची सुपरहिट हॉरर-कॉमेडी फ्रँचायझी 'भूल भुलैया'चा तिसरा भाग जाहीर झाला आहे. 2022 मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाच्या दुसऱ्या भागात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता कार्तिक आर्यनने याची घोषणा करणारा एक टीझर शेअर केला आहे. विशेष म्हणजे या तिसऱ्या भागात चित्रपटाच्या पहिल्या भागात मंजुलिकाच्या भूमिकेत दिसलेली अभिनेत्री विद्या बालन पुनरागमन करणार आहे.कार्तिकने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक टीझर व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये तो आणि विद्या बालन एकत्र दिसत आहेत. हे शेअर करत कार्तिकने लिहिले की, 'हे होणार आहे. मंजुलिका 'भूल भुलैया'च्या दुनियेत परत येत आहे. त्यांचे स्वागत करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. ही दिवाळी खूप उत्साहाची असणार आहे. कार्तिकने त्याच्या पोस्टमध्ये दिग्दर्शक अनीस बज्मी आणि निर्माता भूषण कुमार यांनाही टॅग केले आहे. यावरून चित्रपटाच्या दुसऱ्या भागाप्रमाणेच तिसरा भागही अनीस बज्मी दिग्दर्शित करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.चित्रपटाचा हा टीझर पाहिल्यानंतर सोशल मीडियावर अनेक चाहते उत्सुक आहेत. रूह बाबा आणि मंजुलिकाला एकत्र पाहणे खूप मजेदार असेल असे लोक म्हणतात. त्याच वेळी, अनेक चाहते अक्षय कुमारला फ्रँचायझीमध्ये परत आणण्याची मागणी करत आहेत. एका यूजरने लिहिले, 'आता अक्षय कुमारलाही परत आणा..'. दुसऱ्या युजरने लिहिले की, 'कार्तिकला कोणतीही अडचण नाही पण अक्षयलाही परत आणले पाहिजे.'

# केएल राहुल राजकोट कसोटीतून बाहेर!

## NCA मध्ये दुखापतीतून सावरतोय, त्याच्या जागी पडिक्कल

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचा मधल्या फळीतील फलंदाज केएल राहुल राजकोटमध्ये इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी देवदत्त पडिक्कलचा संघात समावेश करण्यात आला आहे. बीसीसीआयने सोमवारी त्याची अधिकृत घोषणा केली. राहुल सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये (NCA) पुनर्वसन करत आहे. पहिल्या चाचणीनंतर केएल राहुलने मांडीत दुखत असल्याची तक्रार केली. पहिल्या कसोटीत दुखापत झाल्याने राहुल दुसरा सामना खेळू शकला नाही.**



भारत आणि इंग्लंड यांच्यातील 5 कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना 15 फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवला जाणार आहे.कर्नाटकच्या देवदत्त पडिक्कलला भारतीय कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी आहे. पडिक्कल यापूर्वी भारताकडून टी-20 क्रिकेट खेळला आहे. पडिक्कल हा कर्नाटकातील अव्वल खेळाडूंपैकी एक आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये 31 सामन्यांमध्ये 2227 धावा केल्या आहेत, ज्यात 12 अर्धशतके आणि 6 शतकांचा समावेश आहे.केएल राहुलसह, रवींद्र जडेजा देखील बंगळुरूमध्ये NCAच्या देखरेखीखाली आहे, जिथे तो बरा होत आहे. दोघांचा फिटनेस रिपोर्ट अजून आलेला नाही. हैदराबाद कसोटीच्या चौथ्या दिवशी रवींद्र जडेजा इंग्लंड कर्णधार बेन स्टोक्सच्या डायरेक्ट हिटने धावबाद झाला. पॅव्हेलियनमध्ये परतताना त्याला चालण्यात अडचणी येत होत्या. केएल राहुलकडे 50 कसोटी सामन्यांचा अनुभव आहे. त्याने भारतासाठी 50 कसोटीत 2863 धावा केल्या आहेत. पाठदुखीमुळे श्रेयस अय्यरला संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. दुसऱ्या चाचणीनंतर त्याने पाठदुखीची तक्रार केली. मात्र, खराब कामगिरीमुळे अय्यर यांना वगळण्यात आल्याचा दावा काही अहवालांमध्ये करण्यात आला आहे. पहिल्या दोन कसोटीत तो विशेष काही करू शकला नाही. 4 डावात एकही अर्धशतक झळकावता आले नाही.5 सामन्यांची कसोटी मालिका 1-1 अशी बरोबरीत आहे. हैदराबादमधील पहिला सामना इंग्लंडने 28 धावांनी जिंकला होता. विशाखापट्टणममधील दुसरा सामना भारताने 106 धावांनी जिंकला. तिसरी कसोटी 15 फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवली जाणार आहे. चौथी कसोटी 23 फेब्रुवारीपासून रांचीमध्ये आणि 5वी कसोटी 7 मार्चपासून धरमशाला येथे होणार आहे.रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, देवदत्त पडिक्कल, रजत पाटीदार, सरफराज खान, केएस भरत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा*, रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, वॉशिंग्टन, सनप्रिटन, वॉशिंगटन बुमराह, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार आणि आकाश दीप.भारत आणि इंग्लंड यांच्यातील 5 कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना 15 फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवला जाणार आहे.कर्नाटकच्या देवदत्त पडिक्कलला भारतीय कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी आहे. पडिक्कल यापूर्वी भारताकडून टी-20 क्रिकेट खेळला आहे. पडिक्कल हा कर्नाटकातील अव्वल खेळाडूंपैकी एक आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये 31 सामन्यांमध्ये 2227 धावा केल्या आहेत, ज्यात 12 अर्धशतके आणि 6 शतकांचा समावेश आहे.केएल राहुलसह, रवींद्र जडेजा देखील बंगळुरूमध्ये NCAच्या देखरेखीखाली आहे, जिथे तो बरा होत आहे. दोघांचा फिटनेस रिपोर्ट अजून आलेला नाही. हैदराबाद कसोटीच्या चौथ्या दिवशी रवींद्र जडेजा इंग्लंड कर्णधार बेन स्टोक्सच्या डायरेक्ट हिटने धावबाद झाला. पॅव्हेलियनमध्ये परतताना त्याला चालण्यात अडचणी येत होत्या. केएल राहुलकडे 50 कसोटी सामन्यांचा अनुभव आहे. त्याने भारतासाठी 50 कसोटीत 2863 धावा केल्या आहेत.पाठदुखीमुळे श्रेयस अय्यरला संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. दुसऱ्या चाचणीनंतर त्याने पाठदुखीची तक्रार केली.

### तिसरा सामना राजकोटमध्ये

भारत आणि इंग्लंड यांच्यातील 5 कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना 15 फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवला जाणार आहे. कर्नाटकच्या देवदत्त पडिक्कलला भारतीय कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी आहे. पडिक्कल यापूर्वी भारताकडून टी-20 क्रिकेट खेळला आहे. पडिक्कल हा कर्नाटकातील अव्वल खेळाडूंपैकी एक आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये 31 सामन्यांमध्ये 2227 धावा केल्या आहेत, ज्यात 12 अर्धशतके आणि 6 शतकांचा समावेश आहे.केएल राहुलसह, रवींद्र जडेजा देखील बंगळुरूमध्ये NCAच्या देखरेखीखाली आहे, जिथे तो बरा होत आहे.

# बुमराहची पत्नी संजना बॉडी शेमिंगची शिकार

## युजरने इंस्टाग्रामवर लिहिले, भाभी दिसत आहेत जाड

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जसप्रीत बुमराहची पत्नी संजना गणेशन बॉडी शेमिंगची शिकार झाली आहे. बुमराहने सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यामध्ये तो आणि त्याची पत्नी संजना गणेशन दिसत आहेत. बुमराहच्या या पोस्टनंतर एका व्यक्तीने कमेंट केली, ज्यावर संजनाला राग आला. वास्तविक बुमराहने पोस्ट केले आणि कॅप्शनमध्ये लिहिले, 'आनंद येथे आहे. ज्यावर कमेंट करताना एका व्यक्तीने लिहिले की, "वहिनी जाड दिसत आहेत."**

ती कमेंट पाहून संजनाला राग आला आणि उत्तर दिले, "तुम्हाला शाळेचे विज्ञानाचे पाठ्यपुस्तक आठवत नाही, तुम्ही महिलांच्या शरीरावर कमेंट करायला आला आहात.. इथून पळून जा.. तुमची हिंमत कशी झाली महिलांच्या शरीरावर टिप्पणी करायची.. पळ. " बुमराहच्या पत्नीचे हे उत्तर चाहत्यांना खूप आवडले आहे. इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यानंतरच्या विश्रांतीदरम्यान बुमराह त्याच्या घरी गेला होता. 5 कसोटी सामन्यांच्या मालिकेत इंग्लंड आणि भारत प्रत्येकी एक सामना जिंकून बरोबरीत आहेत. तिसरा सामना 15 फेब्रुवारीपासून राजकोटमध्ये खेळवला जाणार



आहे. बुमराहने दुसऱ्या कसोटीत 9 विकेट घेतल्या. इंग्लंडच्या दुसऱ्या डावात बुमराहने अप्रतिम गोलंदाजी करत 6 विकेट्स आपल्या नावावर केल्या. जसप्रीत बुमराहला त्याच्या उत्कृष्ट गोलंदाजीसाठी सामनावीराचा किताब देण्यात आला. याशिवाय बुमराह सर्वात जलद 150 कसोटी बळी घेणारा भारतीय वेगवान गोलंदाज ठरला आहे. आता मालिकेच्या तिसऱ्या कसोटीत बुमराहकडून पुन्हा एकदा सर्वांना अपेक्षा असतील.गेल्या आठवड्यात तो आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचला होता.

### बुमराहचे सध्या 881 रेटिंग गुण

बुमराहचे सध्या 881 रेटिंग गुण आहेत, जे त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम आहे. ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्स, अश्विन आणि रबाडा यांना मागे टाकत त्याने अव्वल स्थान गाठले.बुमराह सध्या एकदिवसीय गोलंदाजांमध्ये सहाव्या आणि टी-20 गोलंदाजांच्या क्रमवारीत 100व्या स्थानावर आहे. पण इतर दोन फॉरमॅटमध्येही तो पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. बुमराह प्रथमच कसोटी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. यासह, तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 स्थान मिळवणारा तो पहिला भारतीय गोलंदाज ठरला.30 वर्षीय बुमराहने 34 कसोटीत 155 विकेट घेतल्या आहेत. 10 वेळा एका डावात 5 किंवा त्यापेक्षा जास्त विकेट घेण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. त्याने 89 एकदिवसीय सामन्यांमध्ये 149 विकेट घेतल्या आहेत.